**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फिजीचे प्रधानमंत्री सितिवेनी राबुका यांच्यात द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्यासंबंधी चर्चा

- गगनयान मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेचा महत्त्वाचा टप्पा असलेली एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरित्या पूर्ण

- उत्तर प्रदेशात रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू, ४५ जण जखमी

**आणि**

- कॅनडात झालेल्या युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील शर्वरी शेंडे हिनं पटकावलं सुवर्ण पदक

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. शहरी विकास, उर्जा, रस्ते आणि रेल्वे या क्षेत्रातील विविध पाच हजार चारशे कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी अहमदाबादमधील खोडलधाम मैदानावर त्यांच्या हस्ते आज होणार आहे. यामध्ये ६५ किमी लांबीच्या महेसाणा-पालनपूर रेल्वे मार्गाचं दुपदरीकरण, कलोल-काडी-काटोसन रस्ता आणि बेचराजी-रानुज रेल्वे मार्गांचं गेज रूपांतरण आदी प्रकल्पांचा समावेश आहे. तसंच काटोसन रस्ता आणि साबरमती दरम्यान एका प्रवासी रेल्वेलाही प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील आणि बेचराजी इथून मालवाहू रेल्वेसेवेचा प्रारंभ करतील. याव्यतिरिक्त, प्रधानमंत्री विरमगाम-खुदाद-रामपुरा रस्त्याच्या रुंदीकरणाचं उद्घाटन करतील आणि अहमदाबाद-मेहसाणा-पालनपूर मार्गावर सहापदरी भुमीगत मार्गाची पायाभरणी करतील. हंसलपूर इथं हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सच्या स्थानिक उत्पादनाचं उद्घाटन

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्या होणार आहे. या बॅटरीज १०० देशांमध्ये निर्यात होणार आहेत.

<><><><><>

१३० व्या घटना दुरुस्ती विधेयकाविरुद्धच्या निदर्शनं केल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज विरोधी पक्षांवर टीका केली. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत, शहा यांनी आरोप केला की विरोधी पक्षांचे नेते तुरुंगात असतानाही सरकार स्थापन करण्याचा आणि चालवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे विधेयकाविरुद्ध केलेली निदर्शनं लोकशाही विरोधी आहेत, असं शहा म्हणाले. या कायद्याच्या कक्षेत प्रधानमंत्र्यांना आणण्याचा आग्रह प्रधानमत्री नरेंद्र मोदी यांनीच केल्याचंही त्यांनी सांगितलं.

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या राजिनाम्याबाबत विचारलं असता हा विषय आणखी न ताणण्याचं आवाहन त्यांनी विरोधकांना केलं.

<><><><><>

भारतीय जनता पक्षाच्या मुंबई अध्यक्षपदी  आमदार अमित साटम यांची निवड करण्यात आली आहे. भाजपा कार्यालयात आज झालेल्या वार्ताहर परिषदेत मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडनवीस यांनी ही घोषणा केली. मावळते अध्यक्ष आशीष शेलार यांच्या कारकीर्दीत भाजपाने अनेक महत्त्वपूर्ण निवडणुका जिंकल्या आणि मुंबईत पक्षाचं अस्तित्व निर्माण केलं असं फडनवीस म्हणाले. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि सर्व वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्यानंतर मुंबईला नवा अध्यक्ष असा निर्णय झाला. त्यानुसार अमित साटम  यांची निवड प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इसरोने गगनयान मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेचा एक टप्पा असलेली एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.

चाचणी यशस्वी झाल्याची माहिती इसरोने आपल्या समाज माध्यमावर दिली आहे. काल श्रीहरिकोटा इथं सतीश धवन अंतराळ केंद्रात झालेली ही चाचणी इसरो, भारतीय हवाई दल, DRDO, भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दल यांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली.

**<><><><><>**

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचं आज लखनऊ इथे त्यांच्या मूळ गावी भव्य स्वागत करण्यात आलं. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक आणि लखनऊच्या महापौर सुषमा खरकवाल यांनी त्यांचं लखनऊ विमानतळावर स्वागत केलं. शुभांशु यांनी त्यांच्या शाळेत आयोजित केलेल्या विजयी संचलनात सहभाग घेतला, त्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. या संचलनावेळी शाळकरी मुलांनी तसंच स्थानिकांनी शुक्ला यांच्यावर फुलांचा वर्षाव केला आणि तिरंगी झेंडे फडकावले. आज संध्याकाळी उत्तर प्रदेशच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने आयोजित केलेल्या समारंभात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते शुभांशु शुक्ला यांचा सत्कार करण्यात येईल.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात बुलंदशहर इथे भाविकांनी भरलेला ट्रॅक्टर आणि कंटेनरमध्ये धडक होऊन झालेल्या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला तर ४५ जण जखमी झाले. राष्ट्रीय महामार्ग ३४ वर घाटाल इथे काल रात्री हा अपघात झाला. हा ट्रॅक्टर कासगंजकडून राजस्थानात गोगामेडी इथं जात होता. या ट्रॅक्टरमध्ये ६१ प्रवासी प्रवास करत होते. वेगाने येणाऱ्या कंटेनरने या ट्रॅक्टरला मागून धडक दिल्याने तो उलटून हा अपघात झाला. जखमींना खुर्जा इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यातल्या तिघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

कॅनडातील विनीपेग इथं झालेल्या युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील शर्वरी शेंडे हिनं काल १८ वर्षांखालील मुलींच्या गटात सुवर्ण पदक पटकावलं. या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणारी शर्वरी ही दुसरी भारतीय महिला स्पर्धक ठरली आहे. या आधी शनिवारी चिकिता तनीपार्थी हिनं २१ वर्षांखालील गटात सुवर्ण पदक मिळवलं होतं. अटीतटीच्या सामन्यात शर्वरीनं आपल्या किम येवोन या दक्षिण कोरियाच्या प्रतिस्पर्ध्यावर ६-५ अशी मात केली. या स्पर्धेत प्रितिका प्रदीप हिने दोन रौप्य पदकं, तर गाथा खडके आणि शर्वरी शेंडे यांनी कास्य पदक पटकावलं आहे.

**<><><><><>**

रशिया आणि युक्रेन यांनी १४६ युध्दकैद्यांची काल देवाणघेवाण केली. संयुक्त अरब अमिरातीच्या मध्यस्तींनंतर त्यांची सुटका करण्यात आली, अशी माहिती रशियाच्या संरक्षण दलानं दिली. सुटका झालेल्या रशियन नागरिकांना बेलारुसमध्ये वैद्यकीय मदत देण्यात येत आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर झेलेन्स्की यांनी संयुक्त अरब अमिरीतीचे आभार मानले आहेत. २०२२ मध्ये रशियाने केलेल्या कारवाईदरम्यान या नागरिकांना पकडण्यात आलं होतं. २३ जुलै रोजी इस्तांबूल इथं रशिया आणि युक्रेनदरम्यान शांततेसाठीची तिसरी फेरी झाली होती.

**<><><><><>**

इस्त्रायलने गाझा शहरावर मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले सुरू केले असून शहराच्या उत्तर पूर्व भागात स्फोटांचे आवाज येत असल्याचं तिथल्या नागरिकांनी सांगितलं. गाझापट्टी ताब्यात घेण्याच्या हेतून इस्त्रायलने हल्ले तीव्र केले आहेत. इस्त्रायलच्या संरक्षण दलांनी हमासला पराभूत करण्यासाठी आणि या युद्धाचा शेवट करण्यासाठी पूर्ण शक्ती पणाला लावल्याचं इस्त्रायलचे संरक्षण मंत्री इस्त्राएल कात्झ यांनी म्हटलं आहे. हमासच्या ताब्यात असलेल्या ओलिसांची सुटका आणि गाझापट्टीवर इस्त्रायलचं पूर्ण नियंत्रण या अटी हमासनं मान्य कराव्यात असा इशारा

त्यांना देण्यात आला होता, त्यानंतर हल्ला तीव्र करण्याची योजना आखली, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेरीलँडमधली सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या बाल्टीमोर शहरात सैन्य तैनात करण्याचा इशारा दिला आहे. डेमोक्रॅट्स पक्षाने शहरातील सुरक्षा रॅलीत सहभागी होण्यासाठी जनतेला आमंत्रित केल्यानंतर मेरीलँडचे गव्हर्नर वेस मूर यांच्याशी ट्रम्प यांच्याशी संघर्ष वाढला आहे. वेस मूर यांना लॉस एंजेलिसमध्ये गॅविन न्यूस्कमने मदत केली तर ते सैन्य पाठवतील, असा इशारा ट्रम्प यांनी समाजमाध्यमाद्वारे दिला आहे. या कारवाईला डेमोक्रॅट्स पक्षानं तीव्र विरोध दर्शवला आहे.

<><><><><>

हिमाचल प्रदेशातल्या अनेक भागात संततधार पावसामुळे पूर आणि दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. ठिकठिकाणी पाणी साचल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. दरड कोसळल्यामुळे दोन राष्ट्रीय महामार्ग आणि राज्यातले ४८२ रस्ते बंद पडले आहेत.

<><><><><>

भारतीय हवामान विभागानं पुढील दोन दिवस देशाच्या वायव्य भागात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. गुजरात, ओदिशा, राजस्थान आणि उत्तराखंडमधल्या काही ठिकाणी उद्या मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, बिहार, छत्तीसगड, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, हरियाणा, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, उत्तर प्रदेश, झारखंड, कोकण आणि गोवा, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममधील काही ठिकाणी आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस या प्रदेशांमध्ये

काही ठिकाणी विजांसह वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

भारत आणि फिजी या दोन देशांमध्ये एक महासागर असला, तरी या दोन्ही देशांच्या आकांक्षा एकत्र प्रवास करतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. त्यांनी आज फिजीचे प्रधानमंत्री सितिवेनी राबुका यांची भेट घेतली आणि दोन देशांमधली मैत्री आणखी बळकट कशी करता येईल, यावर चर्चा केली. या भेटीनंतर दोन्ही नेत्यांनी माध्यमांसमोर संयुक्त निवेदन केलं.

राबुका यांचं काल तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आगमन झालं. राबुका यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुलुएती राबुका तसंच वरिष्ठ शिष्टमंडळ आहे. केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी काल संध्याकाळी त्यांची भेट घेतली. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात दिली आहे.

**//<><><><><>//**